# भारतीय उद्योजिका

## शून्य ते शिखर

प्रकाश बियाणी

अनुवाद – सुवर्णा बेडेकर

Indra Publishing House
www.indrapublishing.com

प्रमुख वितरक : अजब डिस्ट्रीब्युटर्स
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी, शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
ajabpublications@gmail.com
www.ajabgroup.com


**भारतीय उद्योजिका शून्य ते शिखर : प्रकाश बियाणी**
अनुवाद : सुवर्णा बेडेकर
© **प्रकाश बियाणी**
**प्रकाशक**
Indra Publishing House
E-5/21, Area Colony,
Hbibganj Police Station Road,
Bhopal 462016
Phone : +91 755 4059620, 4030921
Email : manish@indrapublishing.com
**Printed by Sheetal Mehta, Kolhapur**

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रीब्युटर्स/रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई वॉर्ड, शामराव विठ्ठल बँकेशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
प्रथम आवृत्ती - २०१०
द्वितीय आवृत्ती - २०१३
जनआवृत्ती - सप्टेंबर २०१६

**किंमत**
₹ ३२५/-



अर्पणपत्रिका

घराचा व्याप कधीही संताप न करता
सांभाळत जिनं आम्हाला घडवलं, त्या आईला.....
उत्तम रांगोळ्या, चविष्ट स्वयंपाक, विणकाम, भरतकामामध्ये तरबेज,
संस्कृत, हिंदी या विषयांत पारंगत,
असंख्य स्तोत्रे, श्लोक, ओव्या, कविता मुखोद्गत असणारी
माझी आई म्हणजे झाकलेलं रत्न आहे!
जिनं आपल्या ज्ञानाचं कधीच प्रदर्शन केलं नाही,
अशी माझी आई - सुलभा रघुनाथ अलाट, सोलापूर हिला
माझं हे अनुवादकार्य अर्पण !!

पुस्तकाविषयी थोडेसे......

## महिलांनी आपलं भविष्य स्वत:च घडवायचं आहे!

'महिला आणि पुरुष यांच्यामध्ये यत्किंचितही फरक नाही' असं लोक का म्हणतात ते मला अजिबात समजत नाही. स्त्री-पुरुष समान आहेत, असं म्हणून ते दोघांमध्ये असलेलं फार चांगलं, सुंदर अंतर अमान्य करतात. ईश्वरानं प्रत्येकाला एक आगळं-वेगळं वरदान देऊनच या धरतीवर पाठवलं आहे. जे काम मी करू शकते, कदाचित ते तुम्ही करू शकणार नाही. अन् तुमचं काम मला जमणारही नाही. हा प्रत्येकातला भेद आपण जाणला पाहिजे.

**– मदर टेरेसा.**

**मदर टेरेसानंतरचा मजकूर**

होय, महिला आणि पुरुष यांच्यामध्ये फरक आहे. मदर टेरेसा यांचं म्हणणं अगदी बरोबर आहे. विधात्यानं या दोन स्वतंत्र, भिन्न, वेगळ्या कृती तयार केल्या आहेत. त्यांच्या उत्पत्तीचं प्रयोजन वेगवेगळं आहे. त्यानुसार त्यांची शारीरिक रचनाही वेगळी आहे. त्यांची मानसिकता भिन्न आहे. अशा कमालीच्या भिन्न कृतींमध्ये समानता शोधणं म्हणजे 'बेसिक्स'पासून दूर जाण्यासारखं आहे. विधात्याच्या कारागिरीमधील खोट काढण्यासारखं आहे.

'महिला आणि पुरुष समान आहेत', असा डांगोरा पिटणं म्हणजे पुरुषप्रधान समाजानं रचलेला डाव आहे. हे वाक्य वारंवार म्हणून पुरुष गेली हजारो वर्षे महिलांचे शोषण करत आले आहेत. हेच मुळी कुणाच्या लक्षात येत नाही. पुरुष आणि स्त्री म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकमेकांना पूरक आहेत. अशी गोंडस विधानेही अगदी सहज केली जातात. 'महिला पुरुषांची बरोबरी करू शकते, परंतु त्याच्यापेक्षा श्रेष्ठ बनू शकत नाही,' असं अगदी ठासून सांगितलं जातं. वास्तविक कोणीतरी कोणापेक्षा श्रेष्ठ बनण्याचा संबंध तुम्ही कोण आहात, याच्याशी अजिबात नाही. निसर्गाकडून प्रतिभेची, प्रज्ञेची देणगी काही स्त्री आहे की पुरुष हे पाहून वेगवेगळी मिळत नाही. तिथं भेदभाव नसतो. पक्षपात असतो तो आपल्या मनात, घरात, माणसाच्या समाजात. वडील, भाऊ, पती, मुलगा अशा पुरुष मंडळींकडून भेदभावाचं जाळं विणलं जातं आणि त्या विणीमध्ये घरातील महिला, कन्या, सुना गुंतत, अडकत जातात.

थोडं भोवताली नजर फिरवली तर तुमच्या लक्षात येईल, भारतीय समाजात महिलांनी घराचा मोर्चा अगदी नेटकेपणानं सांभाळला. मुलांना जन्म देणं, त्यांचं पालन-पोषण करणं, त्यांच्यावर संस्कार करणं, घरातल्या वृद्धांची काळजी घेणं. यासारख्या महत्त्वाच्या 'घरगुती' जबाबदाऱ्यातून पुरुषांना अगदी मुक्त करण्याचं काम महिलांनीच केलं. त्यामुळे घराबाहेर पडून पैसा कमावणे आणि प्रतिष्ठा मिळवण्याचं एकमार्गी काम पुरुष निर्धास्तपणे करू शकले. पुरुषांनी केलेल्या कामाची त्यांना खूप

शाबासकी मिळाली, वाहवा झाली. त्यांचं सगळे गुणगान करू लागले. परंतु घरात राहणाऱ्या महिलेला काय मिळालं? चार भिंती आणि घराचा उंबरठा! हेच तिचं क्षेत्र!! महिलांनी काय गमावलं? आत्मनिर्भरता, आपली महत्त्वाकांक्षा. यामुळं समाजाची खूप प्रचंड, मोठी हानी झाली. प्रतिभावान, बुद्धिमान महिला गृहिणी बनल्या. त्याऐवजी त्यांनी बाहेर पडून करिअर केलं असतं तर आपल्या देशाचं आणखी भलं झालं असतं. उंबरठ्याच्या आत राहणाऱ्या महिलांमुळं पन्नास टक्क्यांहून जास्त ऊर्जावान, उत्पादक मानवसंपदेचा वापरच झाला नाही. ही बौद्धिक संपदा अक्षरश: कुजून गेली. वाया गेली.

आज गृहिणी अर्थात गृहव्यवस्थापिका असणाऱ्या महिलांचे घर-संसार सांभाळण्याचे श्रममूल्य चुकवण्याची वेळ आली तर? ही भरपाई पैशाच्या मोबदल्यात नक्कीच करता येईल. परंतु पुरुषाने निर्धास्त बाहेर काम करावे, म्हणून घराचा सगळा भार पेलणारी स्त्री देत असलेल्या मानसिक बळाचे मूल्यांकन कसे करणार? हे मूल्य कोणत्याच रूपाने चुकवता येणार नाही. हे सत्य आहे. ही वस्तुस्थिती झाकून टाकण्यासाठी भारतीय पुरुषांनी महिलांचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले. त्यांना विकसित होऊ दिलं नाही. त्यांना आत्मनिर्भर बनू दिलं नाही. नारी ही नारायणी आहे. नर आणि नारायण, अशा दोघांनाही जन्म घेण्यासाठी नारीची कूस लागते. अशी नारेबाजी आम्ही खूप केली, ऐकली; परंतु दैनंदिन जीवनात मात्र नारीला नोकराणी बनवलं.

मुलींना जास्त शिकवण्याची गरज नाही. कारण त्या परक्याचं धन. त्यांना चांगलं-चुंगलं खायला द्यायचीही आवश्यकता नाही, कारण त्या कुठं वंशाचा दिवा आहेत? 'कुलदीपक' शिक्षणात प्रगती करत नसेल तरी त्याला शिकवण्या लावा पण शिकवा. मुलगी बुद्धिमान असेल अन् तिची शिकण्याची इच्छा असली तरी वयात येताच तिला आधी घरकाम करायला लावलंच पाहिजे. कारण तिच्या नशिबी घर-संसार आहे. तिनं पत्नी बनावं, माता बनावं, जीवनाच्या अंतापर्यंत वडील, भाऊ, पती, पुत्रांची सेवा केली पाहिजे; अशी ठाम समजूत असणारी पिढीच्या पिढी आजही आपल्या समाजात फार दूर नाही, अगदी आपल्या अवती भवती वावरते आहे. नवीन पिढीतील वाचकांना हे कदाचित पटणार नाही. परंतु समाजाकडे डोळसतेने पाहिलं की हे चित्र नक्कीच दिसेल.

या पुस्तकाचा विषय आहे- उद्योग जगत! इथं प्रतिभेला पुरस्कार दिला जातो. तुमच्यातील गुणांचा सन्मान केला जातो. मग तुम्ही स्त्री आहे की पुरुष हा मुद्दा इथं गौण ठरतो. भारतीय उद्योग जगतामध्ये ज्या महिला धडाडीने कार्य करतात, त्यांचा परिचय करून देण्यात आला आहे. सन्मान आणि संपदा कधी कोणी चांदीच्या तबकातून भेट देत नाही. हे तर स्वत: कमवावं लागतं. 'किलो-दीड किलो स्वाभिमान द्या हो'- असा बाजारात तो विकत मागून मिळत नाही तर त्यासाठी आत्मनिर्भरतेचा पाया रचावा लागतो आणि आत्मनिर्भर होण्यासाठी स्वत:च आपलं भविष्य निवडावं लागतं, घडवावं लागतं; असं या पुस्तकातल्या प्रत्येक नायिकेला वाटतं. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळं अवघं जग खूप जवळ आलं आहे आणि नव्या क्षेत्राची अनेक दालनं उघडली आहेत. तितकीच तीव्र स्पर्धा वाढली आहे. अशा स्पर्धेत आपला टिकाव लागण्यासाठी पुस्तकांतील उद्योजिकांनी दिलेले सल्ले खूप महत्त्वाचे आहेत. त्या सांगतात, 'सामान्य महिलांनी आधी आपली मानसिक जडणघडण (माइंडसेट) बदलावी.' पेप्सीकोच्या इंद्रा नूयी सांगतात, 'मी महिला आहे, त्यामुळेच मी इतरांपेक्षा जास्त स्मार्ट आहे. महिलेच्या क्षमतेला कोणतीच सीमा, मर्यादा नाही.' तर एचएसबीसीच्या नैना किडवाई म्हणतात, 'कृपया मला कोणी वुमन एक्झिक्यूटिव्ह म्हणू नका. मी एक प्रोफेशनल एक्झिक्यूटिव्ह आहे, अन् त्याचं पूर्ण मूल्य मी वसूल करते.'

अशी अनेक उदाहरणे तुम्हाला या पुस्तकात वाचायला मिळतील. टॅफे ट्रॅक्टरची जाहिरात तुम्ही छोट्या पडद्यावर पाहता. या दणकट वाहनाचं डिझायनिंग करून एक महिला थांबली नाही तर शेतकऱ्यांच्या या मित्राची निर्मिती कशी केली, त्याची कहाणी नक्कीच वाचनीय आहे. ट्रॅक्टरवाल्या मल्लिका श्रीनिवासन् म्हणतात, ''स्वत:चा मार्ग स्वत: निवडा. वेगळे करण्याचे लक्ष्य ठेवा अन् त्याच्या पूर्तीसाठी आपली क्षमता पूर्णांशाने वापरा. आकाशाला गवसणी घालण्याची महत्त्वाकांक्षा ठेवा, परंतु आपले पाय जमिनीलाच टेकलेले असू द्या....''

मुलींना स्वप्नांच्या, कल्पनेच्या, महत्त्वाकांक्षेच्या राज्यात मनसोक्त विहार करू देणारे आजचे माता-पिता आहेत. हे प्रमाण हळूहळू वाढतंय. हेही नसे थोडके! आपल्या अवती-भवती वावरणाऱ्या आजच्या कन्या उद्या सुघड, जबाबदार महिला बनणार आहेत....त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी, भराऱ्या मारू इच्छिणाऱ्या इवल्याशा पंखात बळ देण्याचं काम आजच्या मातांनी आवर्जून केलं पाहिजे.....यासाठी त्यांनी 'दिल है छोटासा....छोटीशी आशा....चांद तारोंको छूने की आशा...आसमानों में उडने की आशा....' हे गाणं रोज जरूर गुणगुणावं , असा सल्ला या पुस्तकात दिला आहे.

भारतीय उद्योग जगतातील नायिकांचा 'किचन ते केबिन' हा प्रवास कसा झाला, हे सांगावं, हा अल्पसा हेतू या पुस्तकामागं नक्कीच नाही; तर आजच्या युवतींनी आपले आदर्श तपासून पाहावेत. या उद्योजकांच्या पंगतीमध्ये आपल्यालाही जाऊन बसायचं आहे, त्यासाठी स्वत:ला घडवावं, असं वाटतं. पुस्तकातील प्रेरणादायी आलेख वाचून भविष्यात अनेक इंद्रा नूयी, अनू आगा, किरण मजुमदार......तयार व्हाव्यात, हीच सदिच्छा!

**प्रकाश बियाणी**

## अनुक्रमणिका

### भाग– १ भारतीय उद्योजिका


१. अनू आगा : शंभर नंबरी सोनं १३
माजी अध्यक्षा– थर्मेक्स

२. किरण मजुमदार शॉ : मल्लिका–ए– बायोटेक. २७
सी.एम.डी.– बायोकॉन इंडिया

३. शोभना भरतिया : भारताचे शुभवर्तमान! ३९
व्हाइस चेअरपर्सन– एच.टी. मीडिया

४. मल्लिका श्रीनिवासन् : ट्रॅक्टरवाली ५३
डायरेक्टर – ट्रॅक्टर्स अँड फार्म इक्विपमेंट (टॅफे)

५. सुलज्जा फिरोदिया : कायाकल्पाची शिल्पकार ६५
मॅनेजिंग डायरेक्टर –कायनेटिक इंजिनिअरिंग लिमिटेड

६. एकता कपूर : 'इडियट बॉक्स'ची कुशल खेळाडू! ८१
क्रिएटिव्ह डायरेक्टर– बालाजी फिल्म्स

७. विद्या मोरकम्बी : बेळगावची यशोदा माता ९३
चेअरपर्सन– रेणुका शुगर्स लिमिटेड

८. राजश्री पाथी : कोइम्बतूरच्या शिंपल्यातील मोती १०७
सी.एम.डी. – राजश्री शुगर्स अँड केमिकल्स लिमिटेड

९. प्रीता रेड्डी : 'अपोलो'ची धडकन ११९
मॅनेजिंग डायरेक्टर – अपोलो हॉस्पिटल ग्रुप

१०. प्रिया पॉल : न थकणारी, न दमणारी यजमान १३७
चेअरपर्सन – एपीजे सुरेंद्र पार्क हॉटेल्स

११. ज्योती नाईक : लिज्जतची लज्जत १५१
अध्यक्षा – श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड

## अनुक्रमणिका

### भाग– २ भारतीय महिला अधिकारी


| | | |
|---|---|---|
| १. | इंद्रा नूयी : पूर्वेची कळी पश्चिमेत उमलली<br>सी.ई.ओ. – पेप्सिको | १६३ |
| २. | नैना लाल किडवाई : चपळ चतुर मनी मॅनेजर<br>सी.ई.ओ.– एच एस बी सी ग्रुप (भारत) | १७५ |
| ३. | रंजना कुमार : ध्येयापुढती गगन ठेंगणे<br>अध्यक्षा – केंद्रीय सतर्कता आयोग | १८७ |
| ४. | ललिता गुप्ते : आगळंवेगळं नेतृत्व<br>चेअरपर्सन – आयसीआयसीआय व्हेंचर्स | १९९ |
| ५. | कल्पना मोरपारिया : यशस्वितेची गाथा<br>आयसीआयसीआयच्या माजी व्यवस्थापकीय संचालक | २०५ |
| ६. | चंदा कोचर : यशस्वितेचा प्रकाश<br>सी.ई.ओ.– आयसीआयसीआय | २१३ |
| ७. | रेणुका रामनाथ : मनमौजी –कामात फौजी<br>आयसीआयसीआय व्हेंचर्सच्या एम.डी.आणि सी.ई.ओ. | २२३ |
| ८. | विनिता बाली : बिस्किट ते बुलंदी<br>सी.ई.ओ. – ब्रिटानिया इंडस्ट्रीज | २३१ |
| ९. | रेणू सूद–कर्नाड : सुघड, सुजाण घर 'वाली'<br>एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर –एचडीएफसी | २३९ |
| १०. | फाल्गुनी नायर : यशाचा झळाळता रंग<br>मॅनेजिंग डायरेक्टर – कोटक महिंद्रा कॅपिटल | २४७ |
| ११. | शांती एकम्बरम् : कामाशी युती आणि आरामाला सुट्टी!<br>एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर – कोटक महिंद्रा कॅपिटल | २५५ |


# भारतीय उद्योजिका
# शून्य ते शिखर

## भाग – १
## भारतीय उद्योजिका

# अनू आगा

## शंभर नंबरी सोनं



जन्म - मुंबई.
शिक्षण - टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मधून अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर.
पद - थर्मेक्सच्या माजी अध्यक्षा.
कार्य - सी.आय.आय. आणि बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशनच्या माजी वरिष्ठ पदाधिकारी आणि सक्रिय सदस्य. निर्धन, वंचित मुलांच्या शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना सक्रिय मदत. एनजीओ - 'आकांक्षा'च्या विश्वस्त-

विधात्याने स्त्रीला काय दिले नाही? भूमीचे धैर्य दिले, सरितेची चंचलता दिली. सकाळच्या सूर्यकिरणांची कोवळिक दिली. पौर्णिमेच्या चंद्राचे सौंदर्य दिले. पर्वताइतकी गगनचुंबी मानसिक उंची दिली. अग्नीचे तेज दिले, जलासारखे कशामध्येही मिसळून जाण्याचा गुण दिला. दवाप्रमाणे स्निग्धता दिली अन् फुलांसारखी कोमलताही बहाल केली. कोमल असणे हे स्त्रीचे बाह्य रूप आहे. अन्यथा स्त्री इतकी मजबूत आहे, वज्रासारखी कठोर आहे की, आग ओकणाऱ्या तप्त सूर्याचाही तिच्यावर काडीइतका परिणाम होत नाही. स्त्रीच्या मनाचा विस्फोट झाला तर अवघा समाज भस्म करण्याची धग आणि क्षमता तिच्यामध्ये आहे. लाज, शरम यांनीही शरमेने मान खाली घालावी, असा अवतार ती धारण करू शकते. सरस्वतीच्या रूपातील स्त्री आनंदी-संतोषी आहे, तर दुर्गा अन् कालीमातेच्या रूपातील स्त्री असुरांचा संहार करणारी आहे.



अनू आगा



# शंभर नंबरी सोनं

पृथ्वीतलावर जगन्नियंत्या विधात्याने बनविलेली प्रत्येक कृती सुंदर आहे. कोणीही कुणापेक्षा लहान नाही की मोठे नाही. प्रत्येक कृती वेगळी असल्याने तिच्यामध्ये स्वत:चे अंगभूत सौंदर्य , कलात्मकता आहेच. त्यामुळे कोणीच कुणाशी कशाही बाबतीत स्पर्धा करण्याची आवश्यकता नाही. आपापल्या परीने प्रत्येकजण पूर्ण आहे. या सगळ्यांमध्ये परिपूर्ण आहे–स्त्री! स्त्रीच्या उदरातून केवळ नरच नाही तर नारायणही जन्म घेतो. या स्त्रीमुळेच इथे सभ्यता, संस्कृती आणि संस्कार यांचा जन्म झाला. त्यांचा प्रसार झाला– आजही होत आहे. विधात्याने स्त्रीला काय दिले नाही? भूमीचे धैर्य दिले, सरितेची चंचलता दिली. सकाळच्या सूर्यकिरणांची कोवळिक दिली. पौर्णिमेच्या चंद्राचे सौंदर्य दिले. पर्वताइतकी गगनचुंबी मानसिक उंची दिली. अग्नीचे तेज दिले, जलासारखे कशामध्येही मिसळून जाण्याचा गुण दिला. दवाप्रमाणे स्निग्धता दिली अन् फुलांसारखी कोमलताही बहाल केली. कोमल असणे हे स्त्रीचे बाह्य रूप आहे. अन्यथा स्त्री इतकी मजबूत आहे, वज्रासारखी कठोर आहे की, आग ओकणाऱ्या तप्त सूर्याचाही तिच्यावर काडीइतका परिणाम होत नाही. स्त्रीच्या मनाचा विस्फोट झाला तर अवघा समाज भस्म करण्याची धग आणि क्षमता तिच्यामध्ये आहे. लाज, शरम यांनीही शरमेने मान खाली घालावी, असा अवतार ती धारण करू शकते. सरस्वतीच्या रूपातील स्त्री आनंदी– संतोषी आहे, तर दुर्गा अन् कालीमातेच्या रूपातील स्त्री असुरांचा संहार करणारी आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर निसर्गाने पुरुषांना कठोर बनवून पौरुष बहाल केले त्याहीपेक्षा काकणभर जास्तच कृपा महिलांवर केली आहे. ममता, कोमलता आणि कमालीची धैर्यशक्ती स्त्रीला दिली आहे. याच कारणामुळे कोणतीही महिला आपल्या कुटुंबाचा सांभाळ करते त्याचबरोबर गरज पडलीच तर कमाविण्याची

जबाबदारीही सहजतेने पार पाडते. परिवारामध्ये कमावून आणण्याचे काम पुरुषाचे! असा अलिखित नियम बनला असला तरी आज पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आर्थिक भार पेलण्याचे काम महिला कुशलतेने करीत आहेत. याचे जिवंत आणि प्रेरक प्रमाण म्हणजे देश-विदेशामध्ये नावलौकिक मिळविणाऱ्या थर्मेक्स कंपनीच्या सर्वेसर्वा अनू आगा! एनर्जी, एन्व्हायर्नमेंटल इक्विपमेंट्स अँड सोल्यूशन्स (ऊर्जा आणि पर्यावरणीय उपकरणे) थर्मेक्स कंपनी बनविते. या कंपनीच्या चेअरपर्सन म्हणून अनू आगा काम पाहतात. अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला की, महिला देव आणि दैव यांच्या विरोधातसुद्धा पूर्ण ताकदीनिशी आणि बहादुरीने सामना करते - हे अनू आगा यांनी आपल्या व्यक्तित्त्वाने आणि कर्तृत्वाने सिद्ध करून दाखविले आहे. तुम्ही जर धैर्य दाखविले, आत्मविश्वासाने ही लढाई खेळली तर तुम्ही पुरुष असा की महिला, भाग्य तुम्हाला साथ देणारच आहे, यात तिळमात्र शंका नाही.

जीवनात येणारी सुखं आणि दु:खं तर परीक्षेचाच कालखंड असतो. जी व्यक्ती सुख आणि संपदा मिळूनही असमाधानी असते, संतुष्ट होत नाही ती पराजित होते. त्यांच्या नशिबामध्ये पराभवाशिवाय काही असतच नाही. त्याचबरोबर दु:खाच्या आणि संकटाच्या काळात ज्या व्यक्ती संयम आणि धैर्य हरवून बसतात त्यांनाही पराजयाचा सामना करावा लागतो. या दोन्ही गोष्टी टाळणेच आपण शिकले पाहिजे. जीवनामध्ये यशस्वी व्हावयाचे असेल तर धैर्य आणि चिकाटीने केलेले प्रामाणिक प्रयत्नच कामी येतात.

आजमितीला थर्मेक्सच्या सर्वेसर्वा असणाऱ्या अनू आगा यांच्या दिवंगत पतीचे- रोहिनटन आगा यांचा मस्तिष्क पुत्र(ब्रेन चाइल्ड) आहे- थर्मेक्स समूह! या पुत्राचे मूळ वॉनसन इंजिनिअरिंग कंपनीमध्ये आहे. पुण्यातील एक पारशी गृहस्थ कै. ए. डी. बाथेना यांनी बॉयलर्स बनवून ते विकण्यासाठी वॉनसन कंपनीची स्थापना केली. श्री. बाथेना यांच्या कन्या अर्नवाजने (अनू) टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्समधील मास्टर पदवी घेतल्यानंतर रोहिनटन धनजीशा आगा यांच्याशी विवाह केला. बाथेना यांनी हळूहळू आपल्या व्यवसायाचा-वॉनसन कंपनीचा कारभार जावयाकडे सोपवला. रोहिनटन आगा यांनी कंपनीचे नव्याने नामकरण केले- थर्मेक्स!! आपल्या कुटुंबाचाच व्यवसाय असल्यामुळे सन १९८५ पासून अनू आगा यांनी थर्मेक्सच्या मनुष्यबळ विभागामध्ये एक्झिक्युटिव्ह म्हणून काम करण्यास सुरुवात केली.



थर्मेक्सचा विस्तार करण्यात रोहिनटन आगा यांना चांगलेच यश आले होते. कंपनीचा नावलौकिक परदेशी बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणावर होऊ लागला होता. अशा ऐन उमेदीच्या काळातच १६ फेब्रुवारी १९९६ रोजी आगा कुटुंबियांवर वज्राघात झाला. थर्मेक्सच्या मुंबई येथील गेस्ट हाऊसमध्ये रोहिनटन आगा यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यामध्येच त्यांचे अकाली निधन झाले. आगा दांपत्याला एक मुलगा- कुरूष, आणि एक मुलगी-मेहर अशी दोन अपत्ये. रोहिनटन यांचे निधन झाले त्यावेळी हे दोघेही इंग्लंड येथे होते. मेहर हिचा पी. एन. पद्मजी यांच्याशी विवाह झाला आहे. पतीच्या वियोगामुळे व्याकूळ झालेल्या अनू आगा यांच्यापुढे प्रश्न होता- ६०० कोटी रुपयांच्या थर्मेक्स कंपनीची सूत्रे आता कोणाच्या हातात सोपवायची? कंपनीच्या कामात त्या लक्ष घालत असल्या तरी संपूर्ण कारभाराची जबाबदारी स्वीकारण्याची त्यांची मानसिक तयारी नव्हती. आणि मुलेही तशी व्यवसायाच्या प्रचंड व्यापाच्या मानाने लहान, अननुभवी होती. मात्र महिला आहे, म्हणून कंपनीचे काम करू शकत नाही-हा मुद्दा अजिबात नव्हता; तर थर्मेक्समध्ये अतिशय जटिल इंजिनियरिंग क्षेत्रातील गुंतागुंतीच्या यंत्रसामग्रीची निर्मिती होत होती. त्यामुळे त्यातील तांत्रिक ज्ञान अनू आगा यांच्याकडे नव्हते-प्रश्न हाच होता. त्यांनी दुसरा विचार केला. रोहिनटन तरी कुठे इंजिनिअर होते? तरीही त्यांनी ही कंपनी उत्तम रीतीने चालविलीच ना? आपल्याकडे चांगल्या- विश्वसनीय लोकांची टीम आहेच. या तंत्रज्ञांच्या मदतीनेच तर रोहिनटन काम करीत होते. मग आता आपणच का मागे हटायचे? या विचाराने अनू आगा यांना बळ मिळाले आणि धाडस आले.

पतीच्या निधनानंतर तीनच दिवसांनी म्हणजे दि. १९ फेब्रुवारी १९९६ रोजी अनू आगा यांनी थर्मेक्सची सूत्रे स्वीकारली. कंपनीचे संपूर्ण कामकाज जाणून घेऊन त्यांनी कामाला सुरुवात केली. तोच वर्षभरामध्ये नियतीने आणखी एक दणका अनू आगा यांना दिला. एका कार दुर्घटनेमध्ये त्यांचा मुलगा कुरूष याचे निधन झाले. ''सन १९९६ ते २००० हा माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण परीक्षेचा काळ होता. मी अगदी एकाकी पडले होते. इंजिनिअरिंग कंपन्यांमध्ये

> आज मावळलेला सूर्य उद्या उगवणारच आहे, हे आपल्याला पक्के ठाऊक आहे. हे एक निसर्गचक्र आहे, असे आपण मानतो. अगदी त्याचप्रमाणे माणसाचा मृत्यू ही सुद्धा निसर्गचक्रातील घटनाच आहे. संकट किंवा वेगळे काही नाही. या भूतलावरच्या प्रत्येकाला कधी ना कधी तरी जावे लागणार आहे. तो जाणारच आहे. असे अनू आगा सांगतात.

मंदीचे दिवस होते. त्याला थर्मेक्सही अपवाद नव्हते. अशा अवघड काळात कुटुंबीय आणि मित्रपरिवाराने मला खूप धीर दिला. त्याचबरोबर विपश्यना, ध्यान-धारणा यामुळे मानसिक बळ मला मिळाले. माझा देवावर पूर्ण विश्वास आहे, परंतु मी अंधश्रद्धाळू बिलकूल नाही. या दु:खाच्या काळातच मला एक धडा मिळाला की, आपल्यासाठी जे काही चांगले आहे, ते एक भगवानच जाणू शकतो. म्हणूनच तो जे काही देईल; मग ते सुख असो की दु:ख, त्याचा सहर्ष स्वीकार आपण केला पाहिजे. सूर्यास्त होणे ही क्रिया आपण नैसर्गिक मानतो. आज मावळलेला सूर्य उद्या उगवणारच आहे, हे आपल्याला पक्के ठाऊक आहे. हे एक निसर्गचक्र आहे, असे आपण मानतो. अगदी त्याचप्रमाणे माणसाचा मृत्यू ही सुद्धा निसर्गचक्रातील घटनाच आहे. संकट किंवा वेगळे काही नाही. या भूतलावरच्या प्रत्येकाला कधी ना कधी तरी जावे लागणार आहे. तो जाणारच आहे.'' असे अनू आगा सांगतात.

फेब्रुवारी १९९६ ते ऑक्टोबर २००४ या आठ वर्षांच्या काळात अनू आगा यांनी थर्मेक्सला कसे सांभाळले? कसे मोठे केले? पुरुषप्रधान कॉर्पोरेट जगतामध्ये त्यांनी किती आणि कशी उंची गाठली? या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याआधी कै. रोहिनटन आगा यांनी आपल्या सासऱ्यांचा वारसा म्हणून मिळालेली कंपनी त्यांच्या (कै. बोथना यांच्या) कन्येकडे गेली त्यावेळी कोणत्या परिस्थितीमध्ये होती, हे पाहणे योग्य ठरणार आहे.

थर्मेक्समध्ये प्रारंभी फक्त लहान क्षमतेचे बॉयलर बनविले जात होते. रोहिनटन यांनी कंपनीची सूत्रे स्वीकारली त्यावेळी इतकेच मर्यादित उत्पादन होत होते. काळाची पावले रोहिनटन यांनी ओळखली आणि त्यांनी वेगवेगळ्या यंत्रांच्या निर्मितीला प्रारंभ केला. एनर्जी, एन्व्हायर्नमेंटल इक्विपमेंट्स अँड सोल्यूशन्स आणि उपकरणे बनविणारा देशातील सर्वात मोठा समूह म्हणून थर्मेक्सला वेगळी ओळख मिळवून देण्याचे कार्य रोहिनटन यांनी केले. प्रत्येक प्रकारच्या बॉयलरबरोबरच थर्मेक्समध्ये फ्लूडाइज्ड बेड कम्बस्टर्स, व्हेपर अॅब्जार्प्शन उपकरण, वॉटर सॉफ्टिंग सिस्टिम, वॉटर ट्रीटमेंट केमिकल्स, पॉवर कंट्रोल्स, इलेक्ट्रॉनिकचे सुटे भाग, एअर पोल्यूशन कंट्रोल समूह इक्विपमेंट्स या यंत्रांची निर्मिती सुरू झाली. पुण्याजवळ पिंपरी-चिंचवड येथे थर्मेक्सचा मोठा-मुख्य कारखाना आहे. त्याचबरोबर इतर १४ ठिकाणी यंत्रनिर्मिती प्रकल्प आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे थर्मेक्सने आपल्या कंपनीमध्येच संशोधन आणि विकास ( आर अँड डी) करण्यासाठी सगळ्या सुविधा निर्माण केल्या आहेत. रोहिनटन आगा यांनी जगभरातील १५ मोठ्या कंपन्यांशी मार्केटिंग आणि तांत्रिक



सहकार्याचा करार केला आहे. यामध्ये अमेरिका, इंग्लंड, जपान, डेन्मार्क, इटली यासारख्या संपन्न देशांतील आप-आपल्या क्षेत्रामध्ये महारथी असणाऱ्या कंपन्यांचा समावेश आहे. थर्मेक्स प्लँटलाही आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. अमेरिकन सोसायटी ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्सनी प्लँटला अनुमोदन दिले आहे. तसेच आयएसओ, डीआयएन, जीओएसटी आणि एसबीएस यांनी हे प्लँट प्रमाणित केले आहेत. जगभरातील डझनाहून अधिक देशांमध्ये थर्मेक्सचे इंडस्ट्रियल क्लायंट्स आहेत.

रोहिनटन आगा यांचे निधन झाले त्यावेळी थर्मेक्सची वार्षिक उलाढाल ६०० कोटी रुपयांची होती. अनू आगा यांनी हा व्यवसाय ८३० कोटींच्या पुढे नेला. थर्मेक्स समूहाची विशिष्ट कार्यसंस्कृती आणि कार्यपद्धती आहे. याच पद्धतीचे पालन आजही कसोशीने केले जाते. जोपर्यंत कर्मचाऱ्याची इमानदारी संशयास्पद नाही, तोपर्यंत त्या कर्मचाऱ्याला कामावरून काढून टाकायचे नाही, असा बाणा थर्मेक्सने कायम ठेवला. एखादा कर्मचारी कामचुकार असला, त्याने अपेक्षित काम नियोजित वेळेत पूर्ण केले नाही तरी ते खपवून घेतले जाते. याचे दुष्परिणामही कंपनीला अनेकदा भोगावे लागले आहेत.

तरुण आणि नव्याने इंजिनिअर झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यांना निपुण बनविणे यासाठी थर्मेक्सचा नावलौकिक आहे. इंजिनिअरिंगचे युवा विद्यार्थी थर्मेक्समध्ये काम करण्याची संधी मिळाली तर उत्तमच मानतात. त्यामुळे बहुतेक नवीन इंजिनिअर्सना आपले करिअर थर्मेक्समधूनच सुरू व्हावे असे वाटत असते. यामुळेच अनेक उद्योगांना कुशल टेक्नोक्रॅट्स पुरविण्याचे काम थर्मेक्सने केले आहे. थर्मेक्समध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या अनेक इंजिनिअर्सनी आपले स्वतंत्र उद्योग सुरू केले आहेत. तसेच काही जणांनी दुसऱ्या कंपन्यांमध्ये मोठ्या हुद्द्याच्या, गलेलठ्ठ वेतनाच्या नोकऱ्या मिळविल्या आहेत. त्यांना आजही थर्मेक्स म्हणजे 'इनक्यूबेशन लॅब' अर्थात अंडपोषण प्रयोगशाळाच वाटते. स्वत:ची कंपनी स्थापन करणारे थर्मेक्सचे माजी इंजीनिअर्स अजय कश्यप, दिलीप चौहान, राजू हलवे, गगन पटवर्धन, सुरेंद्र चटर्जी, प्रसाद कुमार, जे.एस.कोठारी, आर. ए. वेंकटाचलम, विनायक देशपांडे, संजय सौंधी ही मंडळी स्वत:ला थर्मेक्सचे ग्रॅज्युएट मानतात. त्याचबरोबर माजी थर्मेक्सियन कंपनीची गृहपत्रिका 'फायर साइड'मध्ये नियमित लेखन करीत असतात. सर्वजण एकमेकांना भेटतात. आपले अनुभव शेअर करतात. अशाच एका गेट-टुगेदरमध्ये अनु आगा म्हणाल्या, ''थर्मेक्समध्ये एके काळी काम करणारे